ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

(४) संस्कृतीचे संवर्धन आणि संक्रमण करण्यात शिक्षकाच्या योगदानाचा अभ्यास करणे.

**संशोधन साहित्याचे अवलोकन:**

प्रस्तुत शोध निबंधासाठी संकलित केलेली माहिती ही दुय्यम स्वरूपाची आहे. माहिती संकलन करण्यासाठी संदर्भ ग्रंथ प्रकाशित व अप्रकाशित मासिके धार्मिक ग्रंथ अशा दुय्यम स्त्रोतांचा वापर करून संशोधनासाठी माहितीचे संकलन करण्यात आले आहे.

**प्रस्तावना:**

प्रत्येक देशाला स्वतःची अशी एकमेव आणि अद्वितीय अशी संस्कृती लाभली आहे. त्यामुळे त्या प्रत्येक राष्ट्राची धार्मिक आणि भौगोलिक परिस्थितीवरून त्या राष्ट्राच्या सांस्कृतिक रचनेची माहिती अस्तित्वात असल्याचे आढळून येत आहे. आपल्या देशाची संस्कृती ही " विविधता मे एकता " हा ठळक गुण दर्शविते. भारतीय संस्कृती ही जगात असलेल्या महान संस्कृती पैकी एक महान संस्कृती आहे. कारण भारतीय संस्कृती ही सर्वसमावेशक, सहिष्णू आणि उदारमतवादी आहे. जेथे दया,क्षमा, शांती आणि त्याग यावरच भारताची संस्कृती आधारित आहे. इतकेच नव्हे, तर भोगापेक्षा त्यागावर प्रेम करणारी आपली भारतीय संस्कृती आहे. तसेच भारतीय समाज सेवाभावी, धार्मिक आणि सर्वांना आपलेसे करणारी आहे. त्यामुळे जगातील इतर राष्ट्रांना आपल्या देशातील संस्कृतीचा हेवा वाटतो. कारण जगातील काही राष्ट्रांमधील समाज आणि संस्कृती हे आक्रमक वांशिक भेदावर आधारित असून असहिष्णुता आणि निर्दयी असल्याचे दिसून येत आहे. पाश्चिमात संस्कृती आणि भारतीय संस्कृती यातील तुलनेचा अभ्यास केल्यावर असे दिसून येते की, पाश्चिमात्त्य संस्कृतीमधील आदर्शमूल्ये,रुढी व परंपरा त्याचबरोबर नैतिकता यात एक वेगळेपणाची जाणीव होते. परंतु भारतीय संस्कृती ही व्यक्तिविकासावर समाजावर आणि संस्कृतीवर प्रभाव निर्माण करणारी संस्कृती आहे. भारतीय संस्कृती अति प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्यामुळे प्रज्ञा,शील , करुणा ,सत्यम, शिवम आणि सुंदरम अशी भारताची ओळख पूर्ण जगभरात आहे. या सांस्कृतिक वारसेचा ठेवा आणि जपवणूक भारतीय व्यक्तींनी आपल्या मूलभूत कर्तव्याच्या माध्यमातून केली आहे.

समाज आणि संस्कृती यांच्या प्रभावाने व्यक्तीचे व्यक्तिमत्व घडत असते. व्यक्तिगत विकासावर समाज आणि संस्कृती यांचा प्रभाव पडतो.कारण नैसर्गिक,भौगोलिक,आर्थिक आणि राजकीय घटक संस्कृतीचे वैशिष्ट्यपूर्ण आजही आपणास एक आदर्श आणि उपयुक्त अशा बाबी आहेत. ज्यामुळे आपल्याला आपल्या सामायिक वारसा आणि संस्कृतीचा ठेवा करण्यास सोपे जाते. त्याचबरोबर या संस्कृतीचा वारसा टिकवणे हे आपले मूलभूत कर्तव्य आहेत.

आपल्या संस्कृतीचे वर्णन तत्त्वज्ञानात केलेले आढळते. विशाल अशा संस्कृतीने नटलेल्या आपल्या देशाला धार्मिक,अध्यात्मिक आणि तात्विक वारसा देखील लाभलेला आहे.थोडक्यात या वैभवशाली संस्कृतीची जाणीव आजच्या तरुण पिढीला करून देणे अत्यंत आवश्यक आहे. कारण पाश्चिमात्य संस्कृती स्वीकारण्याच्या नादात आपल्या खऱ्या संस्कृतीची जाणीव आजच्या तरुण पिढीला नाही. जर ती संस्कृती टिकवायची असेल तर त्या भारतीय संस्कृतीचे जतन संक्रमण आणि संवर्धन हे शिक्षणाच्या माध्यमातून होणे. अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे संस्कृतीला शिक्षणाची जोड देणे आवश्यक आहे. म्हणजेच सांस्कृतिक मूल्यांची ओळख आणि

ISSN–2277- 8721

Electronic International Interdisciplinary Research Journal

EIIRJ

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

जोपासना करण्यासाठी शिक्षणात इतर विषयांच्या अभ्यासक्रमाबरोबर कला,साहित्य, संगीत,शिल्प, नाट्य,क्रीडा आणि धार्मिक-अध्यात्मिक यासारख्या विषयांची जोड देणे आवश्यक आहे.

**संस्कृतीचे जतन:**

मानवाच्या वर्तनात अपेक्षित बदल घडून आणण्यासाठी शिक्षण हा उत्तम मार्ग आहे. मानवाच्या विविध प्रवृत्ती आणि भावना यांना परिस्थितीनुसार सुसंस्कृत वळण लावण्याचे कार्य शिक्षणाद्वारे केले जावेत. म्हणून शिक्षणाला समाज नियंत्रण आणि परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले जाते. शिक्षणामुळे नैतिक आणि सामाजिक मूल्यांची जाणीव होते. त्यामुळे शिक्षणाच्या माध्यमातून संस्कृतीचे जतन, संक्रमण आणि संवर्धन करणे आवश्यक आहे. कारण संस्कृतीचा संबंध हा शिक्षणाशी औपचारिक आणि अनौपचारिक स्वरूपाचा आहे. त्यामुळे शिक्षणाद्वारे संस्कृतीचे संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे.जेणेकरून विद्यार्थ्यांना शिक्षणातूनच संस्कृतीची जाणीव निर्माण होऊन संवर्धन करण्याचे विडा उचलतील. यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून संस्कृतीचे जतन करणे आवश्यक आहे.

(१) **ऐतिहासिक वारसाबाबत जनजागृती:** इतिहासाच्या अभ्यासातून भारतीय समाजाची उत्क्रांती संस्कृती आणि संघर्ष या सर्व गोष्टी विद्यार्थ्यांना देणे आवश्यक आहे.इतिहास हा विषय शिक्षणाचा एक भाग नसून तो ऐतिहासिक वारशाची नोंद ठेवणारा घटक आहे. त्यामुळे मागील पिढ्यांचे वैचारिक धार्मिक सांस्कृतिक सामाजिक राजकीय आणि नागरी संरचनेची जाणीव आजच्या विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे महत्त्वाचे आहे.याशिवाय शिक्षकाने भारताच्या सामायिक ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसांच्या संदर्भात नवनवीन माहिती आजच्या पिढीला ज्ञात करून देणे आवश्यक आहे.देशातील थोर पुरुषांचा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वांचा विद्यार्थ्यांवर सकारात्मक प्रभाव कसा घडवून आणता येईल या बाबींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. त्याचबरोबर थोर पुरुषांच्या तत्त्वज्ञानाच्या शिकवणी विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविता आल्या पाहिजेत.

(२) **सामाजिक प्रबोधन:** समाज प्रबोधन हे शिक्षणाचे महत्त्वाचे कार्य आहे खऱ्या अर्थाने समाजाच्या गरजेतूनच शाळेची निर्मिती झाली आहे. त्यामुळे शाळेचा पर्यायाने शिक्षणाचा उपयोग समाजासाठी होणे अपेक्षित आहे शिक्षणाच्या सहाय्याने समाजातील लोकांचे प्रबोधन करता येते तसेच जाणीव जागृती निर्माण करून समाज परिवर्तन घडवून आणता येते. सामाजिक प्रबोधनाच्या साह्याने चांगल्या नीती मुलांची ओळख करून देता येते म्हणून शिक्षणाबरोबर प्रवचन भजन कीर्तन अशा अनेक मार्गांचा अवलंब शिक्षणात करून संस्कृतीबद्दल विविध स्वरूपाची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविता येते.

आज महाराष्ट्रातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांवर चांगल्या मूल्यांची आणि संस्काराची ओळख करून देण्यासाठी समर्थ रामदास यांच्या श्री मनाचे श्लोकांचा आधार घेण्यात येत आहे.

**सुसंगती सदा घडो | सुजन वाक्य कानी पडो |**
**कलंक मातीचा झडो | विषय सर्वथाना नावडो ||**

अर्थात, सुसंगत लाभण्यासाठी आपल्या गुरु चरणी एकाग्र होणे आवश्यक आहे. कारण चांगल्या मुलांची ओळख करून

देण्यात गुरु महत्त्वाची भूमिका बजावतो.त्याचबरोबर या श्लोकामुळे आई-वडिलांचा आदर, गुरुजनांचा आदर, अतिथी यांची आदर व त्याचबरोबर प्रत्येकाशी मानसन्मानाने वागण्याची सवय विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होते. त्यामुळे शिक्षणात अशा काही घटकांचा समावेश केल्यावर विद्यार्थ्यांवर शैक्षणिक संस्कार बरोबर आध्यात्मिक तात्विक संस्कार करता येतात.

(३) **कौटुंबिक आणि अध्यात्मिक संस्कार:** प्रत्येक कुटुंबाची आपली एक जीवन प्रणाली असते.धार्मिक,सामाजिक आणि आर्थिक पार्श्वभूमीनुसार ही जीवन प्रणाली व कौटुंबिक संस्कृती ठरत असते.त्याचबरोबर प्रत्येक धर्मानुसार अनुयायी आचरण करत असतात.विविध कुटुंबात आपल्या धार्मिक प्रथेनुसार सण-उत्सवे साजरी करताना दिसून येतात. या सण उत्सवाबरोबर आपल्या मुलांवर अध्यात्मिक संस्कार करणे, हे आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचे आहे.कारण अध्यात्मिक संस्कारामुळे चांगल्या शिकवणी आजच्या तरुण पिढी मध्ये निर्माण करता येते. अनेक कुटुंबामध्ये अगदी लहानपणापासून चांगलं शिकवणी मुलांना दिल्या जातात. जसे,

**बरे सत्य बोला यथातथ्य चाला | बहुमणिती लोक तेने तुम्हाला |**
**धरा बुद्धी पोटी विवेकी मुले हो | बरा गुण तो अंतरा माजी राहो ||**

(४) **सामाजिक मूल्यांचे उन्नयन:** मुल्य म्हणजे ज्याला आपण चांगले आणि योग्य समजतो. ज्याच्यामुळे आपल्यात दयाळूपणा ,सभ्यता,प्रामाणिकपणा आणि सहिष्णुता इत्यादी मूल्यांची रुजवणूक मानवी मनावर करता येते. त्यामुळे सामाजिक मुलांचे व्यक्तीकडून आपोआप पालन होते. जसे सार्वजनिक, स्वच्छता, बंधुता आणि चांगली नीतिमत्ता इत्यादी. या सामाजिक मूल्यांची रुजवणूक विद्यार्थ्यांकमध्ये करणे आवश्यक आहे जेणेकरून सामाजिक मूल्यांचा विकास होऊन आपल्या संस्कृतीचे जतन संवर्धन आणि संक्रमण त्यांना करता येईल. त्यासाठी आजच्या पिढीला अध्यात्मिक शिकवण देणे आवश्यक आहे.

**संस्कृतीचे संवर्धन आणि संक्रमणासाठी शैक्षणिक अभ्यासक्रमाची रचना:** शैक्षणिक अभ्यासक्रमातून आणि पाठ्यक्रमातून निर्धारित करण्यात आलेली शिक्षणाची ध्येय आणि उद्दिष्ट साध्य करण्याचा प्रयत्न केला जाणे आवश्यक आहे शिक्षणाचे ध्येय आणि उद्दिष्टे साध्य करण्यासाठी अभ्यासक्रम हे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. अभ्यासक्रमाची मांडणी किंवा रचना करत असताना त्यात संस्कृतीचे जतन संवर्धन आणि संक्रमण कसे करता येईल. याविषयी दृष्टिकोन असल्यामुळे देशाची संस्कृती धर्म तत्त्वज्ञान वांग्मय कला इतिहास इत्यादी महत्त्वाच्या सांस्कृतिक बाबी विद्यार्थ्यांपर्यंत
पोहोचविता येतात त्याचबरोबर त्या अभ्यासक्रमाद्वारे विद्यार्थ्यांच्या मनावर चांगले संस्कार घडवून आणता येतात.

(१) **धार्मिकतेचा विकास:** अध्यात्मिक प्रवृत्तीच्या विकासाने व्यक्तिमत्व घडवून आणण्यास मदत होत असते भारतीय धार्मिक तत्त्वज्ञाने जगामध्ये आदर्श तत्त्वज्ञान मानले जाते. कारण प्राचीन भारतीय अध्यात्माने एकेकाळी पूर्ण जगाला मार्गदर्शन केले आहे. त्या अध्यात्मिक आणि धार्मिक मूल्यांच्या विकसनातून संस्कृतीचे संक्रमण आणि संवर्धन करता येते हे शिक्षणाच्या कार्याद्वारे यशस्वीपणे पूर्ण करता येऊ शकते म्हणून आजच्या तरुण पिढीवर धार्मिक संस्कार होणे आवश्यक आहे.

(२) **संस्कृतीच्या संक्रमणात आणि संवर्धनात शिक्षकाचे योगदान:** संस्कृतीचे जतन संवर्धन आणि संक्रमण या तीन प्रक्रियांमध्ये शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते.कारण शिक्षक आपल्या कृतीतून त्याचबरोबर अध्यापनातून आणि व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक मूल्यांचे प्रवर्तन करू शकतो. म्हणून शिक्षकाला सामाजिक अभियंता म्हटले जाते. सामाजिक मूल्यांची रुजणूक करणे. विद्यार्थ्यांच्या सामाजिकरण करण्यासाठी आणि त्यांच्या वर्तनाला योग्य चालना आणि वळण देण्याचे कार्य शिक्षणाद्वारे केले जाते. त्यासाठी शिक्षकाने एक विधायक समाज कार्यकर्ता म्हणून संस्कृतीची रुजवणूक विद्यार्थ्यांमध्ये करणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षकाने एक जबाबदार व्यक्ती म्हणून योग्य मूल्यांची रुजवणूक विद्यार्थ्यांमध्ये करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर चांगल्या आणि वाईट गुणांची जाणीव तरुण पिढीला करून देणे आवश्यक आहे. याकरिता धार्मिक आणि अध्यात्मिक मार्गाचा अवलंब करणे सोयीस्कर आहे.

**बुरा जो देखन मैं चला, बुरा ना मिल्या कोई,**
**जो मन देखा अपना, तो मुझसे बुरा ना कोई ।**

कबीर यांच्या अमृतवाणीतील या दोहाचा थेट परिणाम आजच्या तरुण पिढीच्या मनावर होतो. म्हणून आजच्या तरुण पिढीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी विविध धार्मिक आणि तात्विक गोष्टींचा आधार घ्यावा. त्यांचे मन प्रवर्तन आणि मनावर थेट संस्कार घडवून आणण्यासाठी धार्मिक श्लोकांचा आधार घ्यावा.

**मना वासना दुष्ट कामा नये रे | मना सर्वथा पाप बुद्धी नको रे|**
**मना सर्वथा नीती सोडू नको हो | मना अंतरी सार विचार राहो ||१||**
**नको रे मना द्रव्य ते पुढीलंचे | अति स्वार्थ बुद्धी न रे पापसांचे|**
**घडे भोगणे ते कर्म खोटे | न होता मनासारखे दुःख मोठे||२||**
**मना सर्वथा सत्य सोडू नको रे | मना सर्वथा मिथ्य मांडू नको रे|**
**मना सत्य ते सत्य वाचे वदावे | मना मिथ्य ते मिथ्य सोडून द्यावे||३||**

**सांस्कृतिक परिवर्तन आणि शिक्षण:** शिक्षणातून योग्य अशी सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणता येते. धार्मिक संस्काराबरोबर विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन जोपासण्यासाठी शिक्षणाचे कार्य महत्त्वाचे मानले जाते. कारण शिक्षणाच्या सहाय्याने धार्मिक संस्काराची रुजवणूक करून ज्या पुरोगामी असे विचार जे अंधश्रद्धेला धारा देतात. त्यांचे निर्मूलन शिक्षणातून होणे आवश्यक आहे. यासाठी शिक्षकाने सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणताना समाजातील ज्या वाईट रूढी परंपरा आणि अंधश्रद्धा यासारख्या गोष्टींची शिक्षणाच्या माध्यमातून निर्मूलन करणे किंवा हद्दपार करणे आवश्यक आहे.जेणेकरून एका चांगल्या सुसंस्कृत समाज आणि तरुण पिढी घडवून आणता येईल ज्याचा समाजावर चांगला परिणाम दिसून येईल.

ISSN–2277- 8721

EIIRJ

Electronic International Interdisciplinary Research Journal

Volume–XI, Special Issue– I

Nov – Dec 2022

OPEN ACCESS

Original Research Article

**निष्कर्ष:**

आधुनिक काळात संस्कृतीची जतन,संक्रमण आणि संवर्धन करावयाचे असेल तर त्यासाठी शिक्षणाचा आधार घेणे आवश्यक आहे. संस्कृती टिकली की भाषा टिकेल, भाषा टिकेल की समाज टिकेल आणि समाज टिकला तर देश टिकेल. या सर्व गोष्टी संस्कृतीचे जतन, संक्रमण आणि संवर्धन शिक्षणाच्या सहाय्याने साध्य होऊ शकेल. आजच्या तरुण पिढीला सुसंस्कार द्यायचे असेल तर शैक्षणिक अभ्यासक्रमात धार्मिक - अध्यात्मिक आणि तात्विक गोष्टींचा एक अभ्यास घटक म्हणून अभ्यासक्रमात समावेश करणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना संस्काराची नीतिमूल्ये शिकवणे सक्तीचे आणि अनिवार्य ठरतील.

**संदर्भ ग्रंथ:**


- शिक्षण शास्त्राचे तत्त्वज्ञानात्मक अधिष्ठान- (शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर दूर शिक्षण केंद्र)
- समर्थ रामदास रचित श्री दासबोध आणि मनाचे श्लोक
- सामाजिक शास्त्रातील तत्वज्ञान - डॉ बी आर जोशी
- शिक्षणशास्त्र - डॉ बी आर जोशी
- भारतीय तत्त्वज्ञान - श्रीनिवास दीक्षित


**Cite This Article:**

***प्रा. मनोज किसन जाधव* , *(2022*)** संस्कृतीचे जतन, संवर्धन आणि संक्रमण करण्यासाठी धार्मिक - अध्यात्मिक आणि तात्विक बाबींचा शिक्षणातील सहभाग, ***Electronic International Interdisciplinary Research Journal,****Volume No XI (Special Issue-I), 87-92.*